दै. प्रजावाणी दि. 19/03/2025

# चार लाखाच्या आठ दुचाकी जप्त

> इरफान काझीसह तीन विधी संघर्षित बालकांवर गुन्हा

प्रतिनिधी • नांदेड



शहरातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या वेगवेगळ्या गर्दीच्या ठिकाणाहून दुचाकी चोरणाऱ्या चोरट्यास इतवारा ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने मुसक्या आवळल्या. आरोपीकडून सुमारे चार लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. चोरलेल्या गाड्यामध्ये आठ मोटारसायकली आणि सहा स्कूटीचा समावेश आहे. आरोपी इरफान अन्वर काझी याच्यासह तीन विधीसंघर्षित बालकांचा दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात समावेश आहे.

वजिराबादच्या शहर वाहतूक शाखेच्या वतीने सुरू केलेल्या वाहन तपासणीत एका विधीसंघर्षित बालकाकडे डुप्लीकेट नंबर प्लेट लावेलली स्कूटी आढळून आली. या संबंधी वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांनी अधिक माहिती घेतली असता, संशयास्पद माहिती समोर येत होती. या वेळी शहर वाहतूक शाखेने इतवारा पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाला बोलावून घेतले. इतवारा डीबीचे प्रमुख रमेश गायकवाड व त्यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी त्या विधीसंघर्षित बालकाला विश्वासात घेऊन अधिक चौकशी केली असता, तीन विधीसंघर्षित बालकांनी स्कूटी चोरण्याचा सपाटा लावल्याची धक्कादायक बाब उघड झाली. त्या तीन बालकांकडून शहरातून वेगवेगळ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीतून चोरी गेलेल्या तीन लाख रुपये किंमतीच्या सहा स्कुटी पोलिसांनी जप्त केल्या. याच बरोबर धनेगाव परिसरात राहणारा इरफान अन्वर काझी (वय १९) याच्या विषयी गोपनिय माहिती मिळाल्यानंतर इरफान याला पोलिसांनी उचलले. त्याच्या ताब्यातील एक लाख रुपये किंमतीच्या दोन मोटारसायकल पोलिसांनी जप्त केल्या. आरोपींनी इतवारा, ग्रामीण आणि भाग्यनगर हद्दीतून या गाड्या चोरी केल्याचे तपासात स्पष्ट झाले. या प्रकरणी त्या-त्या पोलीस स्थानकात दुचाकी चोरीला गेल्याचे गुन्हे देखील दाखल आहेत.

ही कारवाई पो.अ.अबिनाश कुमार, अपोअ खंडेराय धरणे, अपोअ. सुरज गुरव, डीवायएसपी सुशिल कुमार नायक यांच्या मार्गदर्शनाली पोनि. रणजित भोईटे, पोउपनि. रमेश गायकवाड, पोलीस पथकातील एकनाथ मोकले, नरहरी कस्तुरे, बंडू कलंवट, रेवणाथ कोरनुळे, काकासाहेब जगताप, राखीव तसेच शहर वाहतूक शाखेतील पोउपनि कोटतीर्थवाले, संदीप राठोड, नामदेव ढगे आदींनी केली.